# भागाकार

## समजून घेऊया

- **एका बरणीत १२ पेढे आहेत. राजू, मीना, सोनू या तिघांत पेढ्यांची समान वाटणी खाली दाखविल्याप्रमाणे करता येईल.**



| एकूण पेढे | प्रत्येकाचा वाटा | | |
|---|---|---|---|
| | राजू  | मीना  | सोनू  |
| १२ | ४ | ४ | ४ |

वरीलप्रमाणे तिघांत एकूण १२ पेढे वाटल्यास प्रत्येकाला [ ४ ] पेढे मिळतील म्हणजे १२ चे प्रत्येकी ४ या प्रमाणे ३ वाटे झाले.

**वस्तूसमूहातील वस्तूंचे समान गट करणे म्हणजे भागाकार.**

- वस्तूंची समान वाटणी करणे म्हणजेच भागाकार. किंवा
- वस्तूंची समान गटांत विभागणी म्हणजेच भागाकार. किंवा
- वस्तूंच्या संख्येतून एकच संख्या पुन्हा पुन्हा वजा करणे म्हणजे सुद्धा भागाकार.

- **एका पिशवीत १० गोट्या आहेत. जर रेणू, मोनू आणि वेणू या तिघांना प्रत्येकी ३ गोट्या दिल्या, तर १ गोटी शिल्लक राहते.**

कसे ते पाहू : त्यासाठी १० भागिले ३ करू.

३ → गोट्या प्रत्येकाला मिळाल्या ← भागाकार

३ जणांत वाटणे ← ३ ) १० → एकूण गोट्या होत्या ← भाज्य

भाजक

९ → गोट्या वाटून झाल्या.

१ → गोट्या शिल्लक राहिल्या. ← बाकी

## सोडवून पाहूया

- **एका चित्र विक्रेत्याकडे ४५ चित्रे आहेत. एका पाकिटात ५ याप्रमाणे चित्रे ठेवल्यास किती पाकिटे लागतील?**

एकूण चित्रे = ४५

एका पाकिटात चित्रे = ५

किती पाकिटे लागतील = ?

शिल्लक चित्रांची संख्या = ?

[   ] ← किती पाकिटे लागतील

एका पाकिटात चित्रे → ५ ) ४५ ← एकूण चित्रे

[   ]

[   ] ← शिल्लक राहिलेली चित्रे

- **एका पुस्तक विक्रेत्याकडे ३० पुस्तके आहेत. ४ गठ्ठे तयार करायचे असल्यास प्रत्येक गठ्ठ्यात किती पुस्तके येतील व किती शिल्लक राहतील?**

[ ] ← प्रत्येक गठ्ठ्यातील पुस्तक संख्या

एकूण गठ्ठे → [ ] ) [ ] ← एकूण पुस्तके

– [ ]

[ ] ← शिल्लक राहिलेली पुस्तके

∴ एकूण पुस्तके = ३०

गठ्ठ्यांची संख्या = ४

गठ्ठ्यांतील पुस्तक संख्या = [ ]

शिल्लक असलेली पुस्तके = [ ]

- **शिक्षकांनी १६ वह्या आणल्या, ४ विद्यार्थ्यांना समान वह्या वाटायच्या असतील, तर प्रत्येकाला किती वह्या मिळतील?**

- **अक्षताकडे ३३ बिस्किटे आहेत. तिच्या ७ मित्रांना समान वाटल्यावर प्रत्येकाला किती बिस्किटे मिळतील व किती शिल्लक राहतील?**

## सराव करूया

१) प्रत्येक विद्यार्थ्याला ३ किलोग्रॅम तांदूळ द्यायचे ठरल्यास १८ किलोग्रॅम तांदूळ किती जणांना मिळतील?

२) ९८ रोपे १२ रांगांमध्ये लावायची आहेत, तर प्रत्येक रांगेत किती रोपे लावावी लागतील?

३) ३७ राजगिरा लाडूंची ६ व्यक्तींना समान वाटणी करायची आहे, तर प्रत्येकाला किती लाडू मिळतील?

४) ३६ रुपये प्रत्येकी ५ याप्रमाणे किती विद्यार्थ्यांना देता येतील?